पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८, लेखा विभाग
क्र.लेखा/२९/कावि/७५४/२०२१
दिनांक :- २७ /०५/२०२१

विषय : कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात होणा-या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजना करणेबाबत.

परिपत्रक,

मार्च २०२० पासून महाराष्टात कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला असून कोरोनाग्रस्त बाधित रूग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. यामुळे या महामारीवरील प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून वेळोवेळी राज्यात लॉकडाऊन जाहीर करण्यात आला आहे. लॉकडाऊन व्दारे अनेक निर्बंध घालण्यात आले आहेत. सदर संसर्गाचा प्रादुर्भाव अद्यापही वाढत असल्याने व त्यामुळे लागू केलेल्या लॉकडाऊन व्दारे घातलेल्या अनेक निर्बंधाच्या अनुषंगाने उत्पन्न कमी होण्याची शक्यता आहे.तसेच राज्य शासनाकडून मनपाला अपेक्षित असलेले वस्तु व सेवा कर अनुदान, महानगरपालिकेच्या नगररचना विकास शुल्क सारखे उत्पन्न, मालमत्ता कर व इतर उत्पन्नावर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच महापालिकेचे न टाळता येणारे खर्च जसे की वेतन व भत्ते व इतर बांधील खर्च व कोविड-१९ संदर्भात प्रतिबंधात्मक उपाययोजनांकरीता निधी उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे व त्याकरीता योग्य ते वित्तीय नियोजन करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने पुढील उपाय योजना करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

१) सर्व विभागांनी पुढील आदेश होईपर्यंत कोणतीही भांडवली स्वरूपाची कामे हाती घेऊ नयेत. तथापी भांडवली कामासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदीच्या ५० % मर्यादेपर्यंत निधी खर्च करता येईल. तसेच किरकोळ दुरूस्ती साठी विभागांना उपलब्ध करून दिलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदीच्या ७५ % मर्यादेपर्यंत निधी खर्च करता येईल.

२) स्थायी / अस्थायी / बाह्य यंत्रणेव्दारे केलेला मनुष्यबळाचा वापर करीताची देयके, पाणी देयके, विद्युत देयके, शासकीय कर, कोविड-१९ संदर्भातील देयके, इत्यादी तसेच काही विभागांना राखीव निधी (मागासवर्गीय, दिव्यांग, महिलांसाठी कल्याणकारी योजना )संदर्भात देण्यात आलेल्या तरतूदीच्या खर्चास बंधन राहणार नाही तथापी विभागांना या व्यतिरिक्त उपलब्ध करून दिलेल्या तरतूदीं पैकी फक्त ७५ % तरतूदीच्या अधीन खर्च करता येईल.

३) कोविड-१९ मुळे उध्दभवलेली परिस्थिती हाताळण्यासाठी वैद्यकीय विभाग, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय, आरोग्य विभाग, रूग्णवाहिका विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशामक विभाग यांचे प्रथम प्राधान्य निश्चित करण्यात येत आहे. प्राधान्य क्रम असलेले विभाग सोडुन इतर कोणत्याही विभागाने, कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना मंजूरी देऊ नये.

उपरोक्त उपाययोजनांचे पुढील आदेश होईपर्यंत सर्व विभागांनी पालन करावे.

18/05/21

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रत,
सर्व संबंधीत विभाग